पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
मध्यवर्ती भांडार विभाग
भांडार खरेदी

ई निविदा सुचना क्रमांक १२/४/२०१०-११

**शुध्दीपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागासाठी साफ सफाई साहित्य (खराटे, गटर सळई फावडे व विळे) खरेदीकामी इच्छुक पुरवठाधारक यांचेकडून ई- निविदा पध्दतीने निविदा भरणेसाठी पुढील प्रमाणे मुदतवाढ देणेत येत आहे.

ई- निविदा फॉर्म स्विकृती :- दिनांक २६/८/२०१० ते दिनांक १/९/२०१०
दुपारी ३=०० वाजेपर्यंत

सही/-
सहा.आयुक्त (भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

जाहिरात क्रमांक - १३१
क्रमांक - मभां/६/कावि/१८८/२०१०
दिनांक - २४/८/२०१०

सही/-
लेखाधिकारी (मध्य.भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**
**मध्यवर्ती भांडार विभाग**
**भांडार खरेदी**
**अल्पमुदत ई - निविदा सुचना क्रमांक १२/४/२०१०-२०११**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरीता साफ सफाई साहित्य खरेदी करणेकामी इच्छुक पुरवठाधारक यांचेकडून ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | अंदाजे किंमत | अनामत र.रुपये | बयाणा र.रु. | फॉर्म फी र.रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनपाचे आरोग्य विभागासाठी साफ सफाई साहित्य खरेदी करणेबाबत | १,००,०००/- | ५,०००/- | १०००/- | १५०/- | ५ दिवस |

सदरची निविदा, पुरवठयाचा तपशिल, अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटी, निविदा शेडयुल इत्यादीची माहिती मनपाच्या **www.pcmcindia.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.सदरची ऑनलाईन निविदा दिनांक १३/०८/२०१० ते दिनांक २०/०८/२०१० अखेर दुपारी ३-०० वाजेपर्यंत भरता येईल. कोणतेही कारण न देता निविदा पूर्णत: किंवा अंशत: मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. सहा. आयुक्त (भांडार) यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे. सदरची ऑनलाईन निविदा www.pcmcgisda.org.in या वेबसाईटवरुन भरता येईल.

सही/-
सहाय्यक आयुक्त (भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

जाहिरात क्रमांक :- १३१
क्रमांक - मभां/९/कावि/४८३/२०१०
दिनांक - ११/०८/२०१०

सही/-
लेखाधिकारी (भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी -४११०१८**
**मध्यवर्ती भांडार विभाग**
**भांडार खरेदी**
**अल्पमुदत ई - निविदा सुचना क्रमांक १२/४/२०१०-२०११**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरीता साफ सफाई साहित्य खरेदी करणेकामी इच्छुक पुरवठाधारक यांचेकडून ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | अंदाजे किंमत | अनामत र.रुपये | बयाणा र.रु. | फॉर्म फी र.रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनपाचे आरोग्य विभागासाठी साफ सफाई साहित्य खरेदी करणेबाबत (सोबतचे शेडयुल प्रमाणे ) | १,००,०००/- | ५,०००/- | १०००/- | १५०/- | ५ दिवस |

**नियम, अटी व शर्ती -**

१) सदर निविदेतील पुरवठ्याचा तपशिल, अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटी,निविदा शेड्युल इत्यादीची माहिती मनपाच्या **www.pcmcindia.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा मनपाच्या फक्त ई-टेंडरींग पध्दतीने मनपाच्या वेबसाईटवरून भरावयाची आहे.

सदरची निविदा फक्त ई-टेंडरींग प्रक्रीयेअंतर्गत दि.१३/०८/२०१० ते दि. २०/०८/२०१० अखेर दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरता ई-टेंडरींग पध्दतीने(Down load & up load) वेबसाईडवरुनच भरता येईल. जे निविदाधारक E--tendering प्रक्रीये अंतर्गत नोंदणी केलेली असेल त्या निविदाधारकांनाच फक्त निविदा भरता येईल.निविदाकारंनी निविदेची फॉर्म फी, बयाणा, रक्कम मनपा खात्यात पेमेंट गेटवे सिस्टीम द्वारे (Electrocnic Banking service) भरावयाची आहे.सदर निविदेचे फॉर्म विक्रीसाठी ठेवणेत येणार नाहीत व फॉर्म स्विकृतीसाठी निविदा बॉक्स ठेवणेत येणार नाही. आवश्यक जादा कागदपत्रे द्यावावयाची असलेस निविदेसोबत स्कॅन करूनच व सत्यप्रत करून अपलोड करता येतील.

२) पुरवठाधारकाने आपले दर सर्व करासह (उदा.जकात, वहातुक इत्यादी) देणे आवश्यक आहे.

३) अटीयुक्त निविदा स्विकृत करणेत येणार नाही.

४) निविदा मंजूर पुरवठाधारकास करारनामा करणेपुर्वी असा ठेकेदार / ठेकेदारी संस्था म.न.पा.चे विद्यमान नगरसेवक व स्विकृत सदस्य यांचेशी संबधीत नाही याबाबत र.रु.१००/- चे स्टँपपेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराईज करुन द्यावे लागेल.

५) निविदा दर मंजूरी दिल्यानंतर शासनाने यामध्ये काही दरवाढ केल्यास कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही.

६) साहित्य आयात करताना म.न.पाच्या नियमानुसार जकात भरणे आवश्यक आहे. जकात माफीचा दाखला मिळणार नाही.

७) निविदा मंजूर झाल्यानंतर पुरवठाधारकास एकूण रकमेच्या ५% प्रमाणे होणा-या रकमेतन भरलेली बयाणा रक्कम वजा जाता उर्वरीत ४% अनामत रक्कम ही राष्ट्रीयकृत/शेडयुल बँकेच्या एफडीआर द्वारे भरावी लागेल. तसेच अनामत रकमेच्या ३% प्रमाणे होणारी रक्कम अधिक र.रु.१००/- चे स्टँप पेपरवर स्वखर्चाने लेखी करारनामा करुन द्यावा लागेल.

८) मंजूर केलेले दर हे आदेशाचे तारखेपासून १ वर्ष कालावधीसाठी ग्राह्य राहील. तसेच मंजूर केलेले दर पुरवठाधारकांवर बंधनकारक राहतील.

९) निाविदेतील स्पेसिफिकेशनप्रमाणे व दिलेल्या सुचनेप्रमाणे साहित्याचा पुरवठा स्वखर्चाने पुरवठा आदेशात नमुद केलेल्या ठिकाणी करावा लागेल. अन्यथा साहित्य स्विकारण्यात येणार नाही. पुरवठा आदेशात दिलेल्या मुदतीत साहित्य न पुरवल्यास, या विभागाने ठरविलेला विलंब आकार आकारण्यात येईल. मुदतवाढ देणे अथवा न देणे हे शाखाप्रमुखांवर अवलंबून राहील.

**(कृ.मा.प)**

१०) सदरची निविदा स्विकृतीचे अंतिम दिनांकाचे दिवशी दुपारी ३=३० वाजता किंवा निविदा कमिटी ठरवील त्या दिवशी व वेळेस निविदा उघडण्यात येतील. त्याबाबतची सुचना मनपा वेबसाईटवर देणेत येईल.निविदा उघडण्याच्या वेळी निविदाकार स्वत: अथवा त्यांचा प्रातिनिधी उपस्थित राहू शकेल.

११) निविदा मंजूर पुरवठाधारकाने पुरविलेले साहीत्य स्पेसिफिकेशन प्रमाणे किंवा त्याच कंपनीचे असले बाबत सक्षम अधिकारी यांची खात्री झाल्याशिवाय साहित्य स्विकारण्यात येणार नाही.

१२) निविदा मंजूर पुरवठाधारकाने साहीत्याचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेस किंवा साहीत्याचा पुरवठा अर्धवट केल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केलेस त्यांनी त्या कामापोटी भरलेली बयाणा / अनामत रक्कम जप्त करुन पुरवठा आदेश रद्द करणेत येईल.व ५ वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात येईल.

१३) सदर साहित्याची तांत्रिक तपासणी पुरवठा करणेपुर्वी अथवा पुरवठ्यानंतर आवश्यकते नुसार मनपाचे सक्षम अधिकारी/मनपाने प्राधिकृत केलेल्या संस्था,/अधिकारी/शासकीय, निमशासकीय संस्था/ प्रयोगशाळा, यांचेकडून करण्यात येतील. याकामी येणारा खर्च संबंधित निविदाकारास करावा लागेल. पुरवठा केलेले साहित्य स्पेसिफिकेशन प्रमाणे, तांत्रिक विवरणानुसार व दिलेल्या सुचनेप्रमाणे असलेबाबत प्रमाणित केल्यावरच साहित्य ताब्यात घेणेत येईल.

१४) निविदा मंजूर पुरवठा धारकाने निविदेसोबत जोडलेली कागदपत्रे अवैध,अपुर्ण किंवा दिशाभूल करणारी असलेस तसेच करारनामा करणेस पाचारण केले असता करारनामा करणेस टाळाटाळ केलेस, किंवा करारनामा करणेस असमर्थता दर्शविलेस,तसेच साहीत्याचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेस,किंवा साहित्याचा पुरवठा अर्धवट केलेस सदर कामापोटी जमा केलेली बयाणा,अनामत रक्कम जप्त करून पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल. व अ.क्र १२ मध्ये नमुद केलेली कार्यवाही करण्यात येईल.

१५) महापालिकेस आवश्यक असलेल्या साहीत्याचा पुरवठा मागणी नुसार १ टप्प्यात किंवा मागणीनुसार वेळोवेळी नव्याने उत्पादित केलेल्या साहीत्याचा पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील.

१६) साहीत्याचा पुरवठा कमी जास्त किंवा रद्द करणेचा अधिकार मा. सहा.आयुक्त (भांडार) यांना राहील.

१७) निविदेतील साहित्य स्पेसिफिकेशन प्रमाणे पुरवठा करणे बंधनकारक राहील

१८) निविदाधारकांवर निवदेतील, करारनाम्यातील, पुरवठा आदेशातील सर्व अटी शर्ती तसेच सक्षम अधिका-यानी दिलेल्या सुचना बंधनकारक राहतील. यापैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास निविदाकारांचे बयाणा अनामत रक्कम जप्त करून पुढील योग्य ती अ. क्र. १२ मधील कार्यवाही करणेत येईल.

१९) पुरवठा केलेल्या साहित्याच्या प्रत्येक नगावर पी.सी.एम.सी. सप्लाय व अनुक्रमांक असे ऑईल पेंटने परमनंट इंक सारख्या पेंटने नाव रंगवून द्यावे लागेल.

२०) सर्वसाधारण परीस्थितीत या पुरवठयापोटी भरलेली अनामत रक्कम १००% काम पूर्ण झाल्या नंतर ६ महिन्यानंतर किंवा अंतिम देयक अदायगीनंतर ३ महिन्यांनी परतावा पात्र राहील. अंशता: अनामत परतावा पात्र नसेल. तसेच हमी कालावधीतही परतावा पात्र नसेल.

२१) निविदे सोबत खोटी, बनावट व दिशाभुल करणारी कागदपत्रे जोडल्यास व तसे सिध्द झाल्यास बयाणा/ अनामत रक्कम जप्तीस पात्र राहील.

२२) कोणतीही निविदा पुर्णत: अथवा अंशत: मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. सहा.आयुक्त (भांडार) यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
सहाय्यक आयुक्त (भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

ठेकेदारांची सही व शिक्का

सही/-
लेखाधिकारी (भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## मध्यवर्ती भांडार विभाग
## भांडार खरेदी
## अल्पमुदत ई - निविदा सुचना क्रमांक - १२/४/२०१०-२०११
## निविदा शेडयुल

कामाचे नाव - मध्यवर्ती भांडार विभागासाठी साफ सफाई साहित्य खरेदीबाबत.

पुरवठाधारकाचे नाव :-

पत्ता :-

| अ. क्र. | साहित्याचे नाव व तपशिल | परिमाण | एकक | प्रती नग दर अंकी र. रु. | प्रती नग दर अक्षरी र. रु. |
|---|---|---|---|---|---|
| १. | गोवा खराटे<br>४० इंच लांब, टणक काडी,<br>(वजन प्रत्येकी ५०० ग्रॅम सरासरी ) | ७,००० | नग | | |
| २. | गटर सळई फावडी<br>(सळई १२एमएम जाड, ६फुट लांब लोखंडी व लवचिक, १० गेज, जाड पत्र्याची पळी ( मनपा नमुन्याप्रमाणे) | १०० | नग | | |
| ३. | विळे (पोलादी)<br>लाकडी मुठीसह (मान्य नमुन्याप्रमाणे) | १०० | नग | | |

सही/-
सहाय्यक आयुक्त (भांडार )
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पुरवठाधारकाची सही व शिक्का

सही/-
लेखाधिकारी (भांडार )
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८